सुप्रिया प्रॉडक्शन्स
आयोजित

# बोलीभाषा एकांकिका स्पर्धा २०२६

"हृदयाची भाषा... बोली भाषा.."

संकल्पना : गंगाराम गवाणकर | संस्थापक : गोविंद चव्हाण

## प्रवेश अर्ज

वर्ष ९ वे

१. स्पर्धक संघाचे नाव:- ________________________________

२. एकांकिकेचे नाव:- ________________________________

३. लेखकाचे नाव:- ________________________________

४. दिग्दर्शकाचे नाव:- ________________________________

५. एकांकिकेचा DRM क्र.:- ________________________________

६. पत्रव्यवहाराचा पत्ता:- ________________________________

७. संघ व्यवस्थापकाचे नाव:- ________________________________

८. व्यवस्थापक भ्रमणध्वनी:- ________________________________

९. नेपथ्य:- ________________________________

१०. पार्श्वसंगीत:- ________________________________

११. रंगभूषा:- ________________________________

१२. वेशभूषा:- ________________________________

१३. प्रकाश : ________________________________

१४.बोली: ________________________________

१५. प्रवेश शुल्क जमा केल्याचा तपशील / रेफरन्स आयडी: ________________________________

________________ स्वाक्षरी दिनांक : ________________

**प्रवेश शुल्क रु. १०००/-** सोबतच्या बँक खाते तपशीलाप्रमाणे अथवा QR कोड स्कॅन करून जमा करावे आणि त्याचा तपशील / रेफरन्स आयडी वरील प्रवेश अर्जामध्ये नमूद करावा.

प्रवेश शुल्क जमा केल्याशिवाय संघाचा प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

Account Name : **Supriya Production**
Account Number : **262100100000383**
IFSC : **SRCB0000262**
Bank Name : **Saraswat Bank**
Branch : **Shimpoli, Borivali West.**

SUPRIYA PRODUCTION
Account Number : 262100100000383, IFSC Code: SRCB0000262
Scan and Pay using any UPI supported Apps

सुप्रिया प्रॉडक्शन्स
आयोजित

# बोलीभाषा एकांकिका स्पर्धा २०२६

"हृदयाची भाषा... बोली भाषा.."

संकल्पना : गंगाराम गवाणकर | संस्थापक : गोविंद चव्हाण

## नियमावली

वर्ष ९ वे

१. ही स्पर्धा सर्वांसाठी खुली आहे.
२. स्पर्धा केवळ मराठीतल्या बोलींकरीता मर्यादित असेल.
३. एकांकिका प्रमाण मराठी भाषेतील नसावी किंवा प्रमाण मराठीचा वापर अत्यंत कमी असावा.
४. लेखनाच्या बक्षिसासाठी प्रादेशिक बोलीमध्ये केवळ बोलीभाषा एकांकिका स्पर्धेसाठीच नव्याने लिहीलेल्या स्वतंत्र एकांकिकेचाच विचार करण्यात येईल. तसेच लेखनाच्या बक्षिसासाठी प्रमाण मराठीमधून बोलीमध्ये रूपांतरित केलेल्या एकांकिकेचा विचार करण्यात येणार नाही.
५. स्पर्धेचे प्रवेश शुल्क रु. १०००/- (रुपये एक हजार मात्र) आहे. एकदा भरलेले प्रवेश शुल्क कोणत्याही कारणास्तव परत दिले जाणार नाही. प्रवेश शुल्क जमा केल्याशिवाय संघाचा प्रवेश ग्राह्य धरला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.
६. प्रवेश नोंदणीची अंतिम तारीख १५ डिसेंबर २०२५ आहे. १७ डिसेंबर २०२५ रोजी, संध्याकाळी ६ वा. प्राथमिक फेरीचे लॉट्स काढण्यात येतील.त्यावेळी सादरकर्त्या संघाच्या एका प्रतिनिधीने उपस्थित राहणे आवश्यक आहे.काही बदल करायचे असल्यास परस्परसंमतीने करून त्याप्रमाणे त्याचवेळी लेखी कळवणे आवश्यक राहील. सादरीकरणाच्या वेळेबाबत नंतर कोणतीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही. मिळालेल्या स्लॉटप्रमाणेच संघांनी आपली एकांकिका सादर करणे बंधनकारक आहे.
७. सादरीकरणाच्या वेळेपूर्वी दोन तास संघांनी प्रयोगस्थळी उपस्थित राहणे आवश्यक आहे. हा नियम स्पर्धक संघांनी कृपया काटेकोरपणे पाळावा. संघ उशिरा आल्यास वेळेचे व्यवस्थापन संपूर्णतः बिघडते, याची संघांनी कृपया नोंद घ्यावी.
८. स्पर्धा प्राथमिक आणि अंतिम अशा दोन फेऱ्यांमध्ये होईल.
९. अंतिम फेरीसाठी ७ स्पर्धक संघांची निवड करण्यात येईल.
१०. प्राथमिक फेरीवेळी सर्व कलाकार व तंत्रज्ञ यादीच्या ३ प्रती, संहितेच्या ३ सुवाच्य प्रती, लेखकाची परवानगी, मराठी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे कायमस्वरूपी किंवा तात्पुरते प्रमाणपत्र वा संहिता परिनिरीक्षणासाठी सादर केल्याची पावती आणि नवीन संहिता असल्यास (अनुवादित वा रुपांतरीत असल्यास तशा उल्लेखासह) लेखकाचे शपथपत्र, नेपथ्य व प्रकाशयोजनेचा आराखडा जमा करणे आवश्यक आहे.
११. प्राथमिक फेरी संपूर्णतः तालीम स्वरूपात होणार असून त्यासाठी सादरीकरणाचा कमाल कालावधी ४५ मिनिटांचा असेल. पूर्वतयारीसाठी संघांना ५ मिनिटे देण्यात येतील. प्राथमिक फेरीच्या सादरीकरणामध्ये जुजबी व केवळ सादरीकरणासाठी आवश्यक नेपथ्य वगळता अन्य नेपथ्य, रंगभूषा-वेशभूषा व प्रकाशयोजना करता येणार नाही. अनेक संघ प्राथमिक फेरीमध्येही अंतिम फेरीप्रमाणेच संपूर्ण नेपथ्य मांडतात. त्यामुळे वेळेचे व्यवस्थापन संपूर्णतः बिघडते, याची संघांनी कृपया नोंद घ्यावी. मात्र प्राथमिक फेरीमध्ये प्रयोग सादर करण्यापूर्वी नेपथ्य व प्रकाशयोजनेचा आराखडा देणे आवश्यक आहे, याची संघप्रमुखांनी नोंद घ्यावी.
१२. अंतिम फेरीसाठी प्रत्येक संघाला ६० मिनिटांचा कालावधी देण्यात येईल. त्यामध्ये नेपथ्य मांडणी, प्रकाशयोजना व अन्य तांत्रिक बाबी आणि एकांकिकेचे सादरीकरण समाविष्ट असेल. मोकळा रंगमंच संघाच्या ताब्यात देण्यापासून सादरीकरण करुन संघाने पुन्हा मोकळा रंगमंच आयोजकांच्या ताब्यात देईपर्यंतचा वेळ हा ६० मिनिटांचा असेल.
१३. एका कलाकाराला एकापेक्षा अधिक एकांकिकांमध्ये सहभागी होता येईल, मात्र अभिनयाच्या पारितोषिकासाठी त्याच्या केवळ एकाच एकांकिकेचा विचार करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.
१४. मागील कोणत्याही वर्षांमध्ये बोलीभाषा एकांकिका स्पर्धा अंतिम फेरीत प्रवेश न मिळालेली एखादी एकांकिका तेच कलाकार संस्थेचे नाव बदलून पुन्हा सादर करत असतील, तर अशा एकांकिकेला / संस्थेला स्पर्धेमध्ये प्रवेश दिला जाणार नाही. तसेच मागील कोणत्याही वर्षांमधील सांघिक पारितोषिकप्राप्त एकांकिका कोणत्याही संस्थेला पुन्हा सादर करता येणार नाहीत. याबाबतचे सर्वाधिकार आयोजक राखून ठेवत आहेत. या सांघिक पारितोषिकप्राप्त एकांकिकांची यादी नियमावलीच्या अखेरीस देण्यात आली आहे.
१५. प्राथमिक फेरीतील कलावंतच अंतिम फेरीत असणे बंधनकारक आहे.

PTO

१६. प्राथमिक व अंतिम फेरीवेळच्या कोणत्याही स्वरूपाचा खर्च/ भत्ता स्पर्धकांना आयोजकांतर्फे देण्यात येणार नाही.
१७. प्राथमिक फेरीची स्पर्धा मुंबई - १९, २० डिसेंबर २०२५ | नागपूर - २७ डिसेंबर २०२५ रोजी घेण्यात येईल.
१८. अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या स्पर्धक संस्थेने सादरीकरणापूर्वी रंगभूमी परिनिरीक्षण मंडळाचे तात्पुरते / कायमस्वरूपी प्रमाणपत्र देणे अत्यावश्यक आहे.
१९. अंतिम फेरीसाठी आवश्यक रंगभूषा, नेपथ्य, प्रकाशयोजना, आदी गोष्टीबाबत अंतिम फेरीत सहभागी झालेल्या संस्थांना स्वतंत्रपणे सांगण्यात येईल. प्राथमिक तसेच अंतिम फेरीसाठी सहभागी संस्थांनी आयोजकांना संपूर्णपणे सहकार्य करावे. अपरिहार्य परिस्थितीत नियोजनात बदल होऊ शकतात. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
२०. स्पर्धक संघांनी प्रवेश अर्ज संपूर्ण भरून supriyaproductions@gmail.com या मेल आयडीवर पाठवावा. पैसे पाठवलेल्या पावतीचा स्क्रीनशॉट मेलमध्ये जोडावा.
२१. मुंबई आणि नागपूर बाहेरील संघांनी त्यांची एकांकिका cd, पेनड्राईव्हद्वारे किंवा google ड्राईव्ह लिंकद्वारे supriyaproductions@gmail.com या मेल आयडीवर योग्य प्रकारे Access देऊन १८ डिसेंबर २०२५ पर्यंत पाठवावी. एकांकिका ऑनलाइन पाठवायची असल्यास तिचे चित्रीकरण करताना ज्या जागेमध्ये चित्रीकरण केले जाणार आहे, त्या जागेत आवाज घुमणार नाही, आवाज स्वच्छ व स्पष्ट येईल, प्रकाश व्यवस्थित असेल याची काळजी घ्यावी. तसेच व्हिडिओ आऊटपुट 1920X1080 रिझोल्युशनमध्ये असावे. एकांकिका ऑनलाइन पाठवताना उद्भवू शकणाऱ्या कोणत्याही तांत्रिक अडचणींना आयोजक जबाबदार राहणार नाहीत.

## बोलीभाषा एकांकिका स्पर्धा
## मागील ८ वर्षातील सांघिक पारितोषिकप्राप्त एकांकिका

**वर्ष १ - २०१६**
प्रथम : पाझर (ओळख, सांगली)
द्वितीय : ड्रायव्हर (निर्मिती रंगमंच, अहमदनगर)
तृतीय : झो केल्यान काम बराबर अर्थात सैराटलेले (सृजन द क्रिएशन, मुंबई)

**वर्ष २ - २०१७**
प्रथम : तीनसान (सृजन द क्रिएशन, मुंबई)
द्वितीय : माकळ (अभिनय, कल्याण)
तृतीय : क फालतुगिरी हं (व्यासंग, मुंबई)
लक्षवेधी : भक्षक (वर्क इन प्रोग्रेस, कल्याण)

**वर्ष ३ - २०१८**
प्रथम : भू भू (शिवरणभूमी, ऐरोली)
द्वितीय : मॅडम (कलासार्थ थिएटर्स)
तृतीय : देवाघरचे पाणी (अभिनय, कल्याण)
लक्षवेधी : मॅट्रिक (नागबादेवी कलामंच, वसई)

**वर्ष ४ - २०१९**
प्रथम : बिराड (कलांश थिएटर, रत्नागिरी)
द्वितीय : पडस का ? (अत्रेय, अंबरनाथ)
तृतीय : रंगबावरी (नाट्यमल्हार, अहमदनगर)

**वर्ष ५ - २०२२**
प्रथम : स्टार (जिराफ थिएटर, मुंबई)
द्वितीय : भाग धन्नो भाग (मुलुंड वाणिज्य महाविद्यालय, मुलुंड)
तृतीय : सवारी भवानी चौकामधी (स्टोरीया प्रॉडक्शन, कल्याण)
लक्षवेधी : राकस (कलासक्त, मुंबई)

**वर्ष ६ - २०२३**
प्रथम : यासनी मायनी यासले (ज्ञानदीप कलामंच, ठाणे)
द्वितीय : जिन्याखालची खोली (कलांश नाट्यसंस्था, मुंबई)
तृतीय : आखाडा (एकदम कडक नाट्यसंस्था, भाईदर)
लक्षवेधी : कोळसा (गुरुनानक खालसा महाविद्यालय, मुंबई)

**वर्ष ७ - २०२४**
प्रथम : "उचल" (रंगवेद, मुंबई)
द्वितीय : "अ डिल" (नाट्यसेवा थिएटर, नाशिक)
तृतीय : "पाटी" (एकदम कडक नाट्यसंस्था, भाईदर)
लक्षवेधी : "टोपरं" (स्वप्नवेद युवा प्रतिष्ठान, सिंधुदुर्ग)

**वर्ष ८ - २०२५**
प्रथम : “जुगाडलक्ष्मी” (गुरु नानक खालसा महाविद्यालय, मुंबई)
द्वितीय : "कुक्कुर" (सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे)
तृतीय : "नवस” (प्रगती सेवाभावी संस्था, बीड)
लक्षवेधी : "मॅ” (मॅड बॉक्स थिएटर, मुंबई)